Maharashtra State
Board Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board,Nashik-422 003.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,नाशिक—४२२ ००३.

Website- www.sscboardnashik.com Email- nsksec@rediffmail.com, sschodnskdb@gmail.com

**तातडीचे/महत्वाचे**

क्र.नाविमं/माध्य.ब-२/ ४९३
नाशिक - ४२२००३
दिनांक - २९/०६/२०२१

प्रति,
मुख्याध्यापक,
नाशिक विभागीय मंडळाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ साठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) साठी अंतिम मुल्यमापन गुण /श्रेणी/ सर्व परिशिष्ट व इतर कागदपत्र मंडळाकडे जमा करणेबाबत...

संदर्भ :- १. परिपत्रक क्र.रा.मं./परीक्षा-२/३३७१/दि.९/६/२०२१ मुल्यमापनाबाबत..
२.क्र.रा.मं./परीक्षा-२/३७१३, पुणे ४११००४ दि. २२/०६/२०२१ तांत्रिक सुचनेबाबत...

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने कळविण्यांत येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र सन २०२०-२०२१ (इ.१० वी) परीक्षेसाठी शासन निर्णय क्रमांक-परीक्षा ०५२१ प्र.क्र.४३ एसडी-२, दिनांक २८ मे २०२१ व राज्यमंडळ परिपत्रक क्रमांक रा.मं./परीक्षा-२/३३७१, दिनांक ०९/०६/२०२१ च्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ इ. १० वी परीक्षेसाठीच्या मुल्यमापन कार्यपध्दतीबाबत कार्यवाही पूर्ण करून निकाल समितीने निकालाचे परीक्षण व नियमन करून निकाल अंतिम केल्याचे परिशिष्ट, विदयार्थ्यांचेनिकाल व अनुषंगिक स्वाक्षरी प्रपत्रे सिलबंद स्वरुपात विषयनिहाय (इ.९ वी ची गुणपत्रक) व खाजगी विदयार्थ्यांचे शेवटच्या इयत्तेचे गुणपत्रक इत्यादी मुल्यमापन गुणतक्ते/श्रेणी/सर्व नियमित, खाजगी पुर्नपरिक्षार्थी व दिव्यांग विदयार्थी यांचे परिशिष्टामध्ये बैठक क्रमांकासह भरलेले एकत्रित गुणांचे एकच सिलबंद पाकिटामध्ये मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीने साक्षांकित करून व आपल्या शाळेचा सांकेतिक क्रमांक सिलबंद पाकिटावर नोंदवून विभागीय मंडळाच्या नियमित संकलित केंद्रावर (नाशिक,मनमाड, मालेगांव,धुळे, चाळीसगांव, जळगांव, भुसावळ व नंदूरबार ) सोमवार दिनांक. ०५/०७/२०२१ रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत मंडळाच्या प्रतिनिधींकडे हस्तपोच जमा करणे अनिवार्य आहे.

तसेच संगणक प्रणालीमध्ये नमूद केलेल्या विषयात बदल अथवा विषयातील सूट यामध्ये दुरुस्ती असल्यास सदर विषयासमोरील गुणांच्या सर्व रकान्यामध्ये **MM** असे दर्शवावे. सदर दुरुस्तीचा तपशिल/बदललेल्या विषयाचे गुण व इतर तपशिल विभागीय मंडळास परिशिष्टामध्ये नोंदवून वेगळया पाकीटात पुढील कार्यवाहीसाठी जमा करावे.

संगणक प्रणालीमध्ये माहिती भरतांना नियमित खाजगी विदयार्थी, नियमित व खाजगी पुनर्परीक्षार्थी म्हणून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या एखाद्या विद्यार्थ्यांकडे जर इ.५ वी ते इ.९ वी या इयत्तामधील (लागू असल्याप्रमाणे अंतिम इयत्तेच्या) गुणपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध नसेल तर सदर विदयार्थ्यांच्या परिशिष्टातील संबंधित रकान्यात तूर्त **MM** असे दर्शवून स्वतंत्र पाकिट तयार करून निकालाच्या मुख्य पाकिटात समाविष्ट करण्यात यावे. मंडळाकडे जमा केलेल्या गुणतक्ते/श्रेणी/सर्व नियमित, खाजगी पुर्नपरिक्षार्थी व दिव्यांग विदयार्थी यांचे परिशिष्ट यांची एक छायाप्रत आपल्याकडे दप्तरी जतन करून ठेवावी. उपरोक्त साहित्य पोस्टाव्दारे पाठविण्यात येवू नये. विहीत दिनांकास साहित्य जमा न केल्यास होणा-या विलंबास मुख्याध्यापक जबाबदार राहतील. तरी विहीत दिनांकास उपरोक्त साहीत्य तात्काळ जमा करण्याची उचित कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सहसचिव(प्र.)
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षणमंडळ,नाशिक विभागीय मंडळ,नाशिक३